## :: प्रेस नोट ::

दि. २४/०४/२०२३

आरोपी लोकसेवक - १. श्री. कुंदन अशोक गायकवाड, प्रथम लिपिक, मध्यम प्रकल्प कार्यकारी अभियंता कार्यालय, उस्मानाबाद , २.श्री.पोपट श्रीधर गरुड, वरिष्ठ लिपीक, लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी,जि.बीड, वर्ग ०३ यांना ३८८०/- ( तीनहजार आठशे ऐंशी रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई .

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | गेवराई |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १. श्री. कुंदन अशोक गायकवाड, प्रथम लिपिक, मध्यम प्रकल्प कार्यकारी अभियंता कार्यालय, उस्मानाबाद , २.श्री.पोपट श्रीधर गरुड, वरिष्ठ लिपीक, लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी,जि.बीड, वर्ग ०३ |
| लाचेची रक्कम | ३८००/- ( तीनहजार आठशे रुपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक २४/०४/२०२३ रोजी तकारदार यांनी तकार दिली की, तकारदार यांचे प्रवास भत्ता दयेकाचा १९४१० रुपयाचा धनादेश मंजूर केल्याचा मोबदला म्हणून तकारदार यांचे श्री.गायकवाड व श्री.गरुड यांनी देयकाचे २० % रक्कम लाचेची मागणी करत आहेत. तकारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तकार दिली.<br>त्यावरुन आज दिनांक २४/०४/२०२३ रोजी सापळा लावला असता पंचा समक्ष श्री.गायकवाड यांनी दुरध्वनीद्वारे २००० रुपये लाच मागणी केली व श्री.गरुड यांनी तकारदार यांना तकारदार यांना मंजुरी झालेला १९४१० रुपयाचा धनादेश त्यांना प्रदान करण्यासाठी स्वत: साठी १८८०/- व श्री.गायकवाड यांचेसाठी २०००/- रुपये लाच मागणी करुन एकत्रित असे २० % प्रमाणे लाच रक्कम ३८८२ रुपये स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरुन आज दिनांक २४/०४/२०२३ रोजी सापळा लावला असता आलोसे श्री.गरुड यांना ३८८०/- रुपये पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>आलोसे १. श्री. कुंदन अशोक गायकवाड, प्रथम लिपिक, मध्यम प्रकल्प कार्यकारी अभियंता कार्यालय, उस्मानाबाद , २.श्री.पोपट श्रीधर गरुड, वरिष्ठ लिपीक, लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी,जि.बीड,यांनी पंचा समक्ष तकारदार यांचे कडे ३८८०/-रुपये लाचेची मागणी करुन आलोसे कमांक ०२ यांनी लाच रक्कम स्विकारली म्हणून त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे आष्टी येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद,श्री.विशाल खांबे,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक,बीड,व पोलीस अंमलदार,श्री.हनुमान गोरे,श्री.सुरेश सांगळे, श्री.भरत गारदे,श्री.संतोष राठोड, श्री.अमोल खरसाडे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड |
| संकेतस्थळ | :- **acbwebmail@mahapolice.gov.in** |
| ई-मेल | :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**<br>**2) dyspacbbeed@gmail.com** |
| ऑनलाईन तकार ॲपलीकेशन | :- **acbmaharashtra.net** |
| टोल फ्रि कमांक | :- १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :- ०२४४२-२२२६४९ |
| व्हॉटस अप क. | :- ९९३०९९७७०० |
| पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद | :- ९९२३०२३३६१ |
| अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद | :- ८७८८६४४९९४ |
| पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड | :- ९३५५१००१०० |

( शंकर शिंदे )
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.